आस्थापनेच्या दैनंदिन उपयोगाकरिता आवश्यक उपकरण, साधनसामुग्री आणि उपकरण संच दैनंदिन वापरात ठेवण्यासाठी उपभोग्य भांडार सामान तसेच संगणक साहित्य पुरविण्यासाठी पुरवठादाराची नियुक्ती करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
संसदीय कार्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- लेसाख २५१७ / प्र. क्र. ७९/ तीन,
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक:- ११ ऑक्टोबर, २०१७.

शासन निर्णय :-

संसदीय कार्य विभागाच्या आस्थापनेकरिता दैनंदिन उपयोगाकरिता उपकरण, साधन सामग्री आणि उपकरण संच वापरात ठेवण्यासाठी आवश्यक उपभोग्य भांडार सामान विकत घेण्यासाठी पुरवठादाराची निवड करण्यासाठी उद्योग, उर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय क्रमांक भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-४, दिनांक १ डिसेंबर, २०१६ मधील तरतुदीनुसार १३ पुरवठादारांकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यापैकी सहा पुरवठादारांकडून प्राप्त झालेल्या विविध ३८ वस्तुंच्या दरांची तुलना करता **मे. झमझम इंटरप्रायझेस, फोर्ट, मुंबई** या पुरवठादाराने सादर केलेले ३१ वस्तूंचे दर हे बाजारभावाशी सुसंगत व तुलनात्मकदृष्टया न्यूनतम आढळले. त्यामुळे सदर पुरवठादारास उर्वरित वस्तु न्यूनतम दराने व उत्तम दर्जाने पुरविण्यास ते तयार आहेत किंवा कसे, तसेच या विभागाने गत वर्षी दिनांक ४ ऑगस्ट, २०१६ रोजी आवश्यक उपभोग्य भांडार सामानाच्या २९ वस्तू पुरवण्यासाठी केलेल्या करारातील १७ वस्तूंचे दर हे मे. झमझम इन्टरप्रायजेस यांनी आता सादर केलेल्या वस्तूंच्या दरापेक्षा कमी असल्याने, उक्त करारातील १७ वस्तूंचा पुरवठादेखील गतवर्षीच्या दरांइतक्या कमी दराने करण्यास तयार आहेत किंवा कसे याबाबत या विभागाच्या दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ च्या पत्रान्वये मे. झमझम इंटरप्रायझेस, फोर्ट, मुंबई यांना विचारणा करण्यात आली होती. त्यानुसार उक्त पुरवठादाराने मूळ दरपत्रकातील ३१ वस्तू न्यूनतम दराने व उर्वरीत वस्तूदेखील न्यूनतम दराने पुरवठा करण्यास सहमती दर्शविलेली आहे. तसेच, मागील वर्षाच्या करारातील वस्तूंचे दर विचारात घेऊन, त्या दरांइतके कमी दर करण्याबाबतदेखील पुरवठादाराने सहमती दर्शविलेली आहे. ही सर्व वस्तुस्थिती विचारात घेता, संसदीय कार्य विभागास आवश्यकतेनुसार पुढील तक्यात नमूद केलेल्या कार्यालयीन साहित्याचा त्यासमोर नमूद केलेल्या दराने पुरवठा करण्यासाठी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ ते दिनांक १० ऑक्टोबर, २०१८ या कालावधीसाठी **मे. झमझम इंटरप्रायझेस, फोर्ट, मुंबई** यांची पुरवठादार म्हणून नियुक्ती करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे:-

अ.क्र. (१)	वस्तूंचे नाव (२)	स्वीकृत केलेला दर (रक्कम रुपये) (३)	कर (४)
१.	करेक्शन पेन (कॅम्लीन)	१८/- (१ नग)	रकाना क्रमांक ३ मधील दर अधिक प्रचलित दराने वस्तू व
२.	पंच (डीपी २८०) (कांगारु)	५०/- (१ नग)	
३.	मार्कर पेन (कॅम्लीन)	१३.५०/- (१ नग)	
४.	पंच मोठा (डीपी ६००) (विटो)	६५०/- (१ नग)	

५.	हायलायटर (कॅम्लीन)	१२/- (१ नग)	सेवा कर (GST)
६.	पंच (डीपी ४६०) (कांगारु)	८१/- (१ नग)	
७.	लाल टॅग (चांगल्या प्रतीचे)	११०/- (१००० नग)	
८.	स्टॅपलर ल. १० (कांगारु)	२८/- (१ नग)	
९.	सफेद टॅग (आनंद ब्रॅंड)	२१/- (१०० नग)	
१०.	स्टॅपलर मोठा (कांगारु)	८६/- (१ नग)	
११.	टाचणी (रोलेक्स)	१०२/- (१ बॉक्स)	
१२.	ऐअर फ्रेशनर (लविंग)	६५/- (१ नग)	
१३.	यू पीन (यू शेप) (क्लासिक)	८.५०/- (१ बॉक्स)	
१४.	सॅमसंग १६६६ टोनर	१७००/- (१ नग)	
१५.	चहाचा जग	२२५/- (१ नग)	
१६.	टोनर रिफीलींग	२२५/- (१ नग)	
१७.	टोनर ड्रम	१९०/- (१ नग)	रकाना क्रमांक ३ मधील दर अधिक प्रचलित दराने वस्तू व सेवा कर (GST)
१८.	पाण्याचा जग	९०/- (१ नग)	
१९.	सेलोटेप (वंडर)	१२/- (१ नग)	
२०.	आय कार्ड प्लॅस्टिक कवर	४/- (१ नग)	
२१.	रबर (नटराज)	१०/- (१ नग)	
२२.	पेन्सील (नटराज)	३३/- (१ बॉक्स)	
२३.	रंगीत पताका	१९/- (१ पाकिट)	
२४.	स्टॅपलर पीन(छोटया) (कोरस)	६/- (१ बॉक्स)	
२५.	गोंद (चांगल्या प्रतीची)	४२/- (१ कि. ग्रॅ.)	
२६.	स्टॅपलर पीन(मोठया) (कोरस)	१३.५०/- (१ बॉक्स)	
२७.	खाकी पाकिटे(छोटी) (९/२X४/२)	१.००/- (१ नग)	
२८.	खाकी पाकिटे(मोठी) (A-४) (८० Gsm)	११०/- (१०० नग)	
२९.	संगणक माऊस (एचपी)	२३५/- (१ नग)	
३०.	संगणक किबोर्ड (एचपी)	५३०/- (१ नग)	
३१.	कचरा पेटी (छोटी)	४०/- (१ नग)	
३२.	पेन ड्राईव्ह (८ जीबी)	३८०/- (१ नग)	
३३.	रबर स्टॅम्प	२५/- (प्रति लाईन)	
३४.	प्लॅस्टिक कॅरी बॅग (मोठी)	१०/- (१ नग)	
३५.	प्लॅस्टिक फोल्डर (मध्यम)	१५/- (१ नग)	
३६.	सि.डी. कवर (साधे)	७५/- (प्रति ५० नग)	
३७.	टाळे (मध्यम आकाराचे)	५५/- (१ नग)	
३८.	कॅनव्हॅस बॅग (मोठया आकाराची)	२३३/- (१ नग)	

२. वरील कार्यालयीन साहित्याव्यतिरिक्त आवश्यकतेनुसार इतर कार्यालयीन साहित्याची मागणी केल्यास पुरवठादारास ती पुरवावी लागेल. अशा कार्यालयीन साहित्याचे दर चालू बाजारभावापेक्षा कमी असणे बंधनकारक राहिल.

३. विभागाच्या आवश्यकतेनुसार वस्तूंची मागणी करण्यात येईल व मागणी केल्यावर सदर वस्तू निश्चित केलेल्या दराने व दर्जानुसार पुरवठा करणे पुरवठादारास बंधनकारक राहील. पुरवठादाराकडून पुरविण्यात येणाऱ्या वस्तूंच्या दर्जात अथवा किंमतीत पुरवठादाराने कोणताही बदल केल्यास सदर वस्तू नाकारणे तसेच या करारनाम्याचे पालन समाधानकारक न झाल्यास करारनामा संपुष्टात आणणे याबाबतचा शासनाचा निर्णय अंतिम राहील.

४. हा शासन निर्णय, शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक - विअप्र - १०.०८ / प्र. क्र. ७० / २००९ / विनियम, दिनांक १५ मे २००९, भाग पाहिला, उपविभाग दोन मधील अनुक्रमांक ४५, नियम क्रमांक १६९ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या पूर्ण वित्तीय शक्तीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक २०१७१०१११४५७३८२८१५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Ramesh Sakharam Sarfare

Digitally signed by Ramesh Sakharam Sarfare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Parliamentary Affairs, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=52e560d0b76dfea3392e26761deeb6b2efc5f1bea42c0dffdc1d69d316ae65a8, serialNumber=0c7001609c3ef1f1a1774b5223846fb28e7bf476529c879e1fd04746bfa60fd7, cn=Ramesh Sakharam Sarfare
Date: 2017.10.11 14:45:25 +05'30'

(र. स. सरफरे)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

प्रत :-

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र - १, मुंबई.
२) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र - १, मुंबई.
३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, अधिदान व लेखा कार्यालय, बांद्रा (पूर्व), मुंबई.
४) मे. झमझम इंटरप्रायझेस, ३९, १ ला मजला, ५९ काकल इमारत, सुंदरलाल बहल पाथ, जि.पि. ओ. जवळ (गोवा पथ), फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
५) अवर सचिव, वित्त विभाग (विनियम), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
६) आहरण व संवितरण अधिकारी, रोख शाखा, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
७) निवड नस्ती.